स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड.

नांदेड विष्णुपुरी - 413 606 (महाराष्ट्र)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या
मानव विज्ञान विद्याशाखेतील इतिहास विषयातील
पीएच.डी. ह्या पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

●संशोधन शीर्षक●

' भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन राजकीय , सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचा झालेला प्रभाव : एक ऐतिहासिक अभ्यास. '

●संशोधक ●

गजानन विश्वनाथ गायकवाड

(एम. ए. सेट)

● संशोधन मार्गदर्शक●

डॉ. विठ्ठलराव व्ही. घुले

प्राचार्य व संशोधन मार्गदर्शक

राजश्री शाहू कॉलेज, परभणी

●संशोधन केंद्र ●

ज्ञानोपासक महाविद्यालय ,परभणी

जानेवारी 2024

प्रस्तावना :

कोणत्याही देशाचा राज्यकारभार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी म्हणजेच चालविण्यासाठी कायद्याची एक संहिता/ दस्तऐवज असणे गरजेचे असते .जेणेकरून तिला अनुसरून देशाचे शासन आणि प्रशासन योग्य प्रकारे आपल्या कार्याची अंमलबजावणी करेल .याचबरोबर संविधान हे फक्त शासन आणि प्रशासन यामधील व्यक्तीसाठीच नव्हे तर देशातील संपूर्ण नागरिकांसाठी अत्यावश्यक अशी बाब आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये असायला हवी हा उद्देश समोर ठेवून स्वातंत्र्य भारतासाठी भारतीयांनी जे संविधान निर्माण केले त्या संविधान निर्मितीवर तत्कालीन राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचा काय प्रभाव झाला आणि तो कितपर्यंत योग्य आहे हे या माध्यमातून समजून घेता येईल.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा सामाजिक स्वातंत्र्य व राजकीय स्वातंत्र्य अशा दोन अंगाने लढला गेलेला होता .या लढ्यातील मूल्याचा किती प्रमाणात भारतीय संविधानावर प्रभाव झाला आहे याचा शोध या माध्यमातून घेता येईल .याचबरोबर भारत हा विविधतेने नटलेला देश आहे या विविधतेने नटलेल्या देशात एकता प्रस्थापित करणे हे खूप अवघड असे काम होते.भारताचा विस्तीर्ण भूप्रदेश अनेक बोलीभाषा अनेक संस्कृत्या यांचा योग्य ताळमेळ घालण्याचे आव्हान संविधान सभेपुढे होते तत्कालीन .परिस्थिती ही देशाच्या फाळणीमुळे गोंधळाची होती. अनेक ठिकाणी अशांतता पसरलेली होती, अशा या गोंधळाच्या परिस्थितीचा संविधान निर्मितीवर काय प्रभाव पडला याचा शोध प्रस्तुत शोधप्रबंधातून घेता येईल. संविधान निर्मात्यांनी अतिशय कष्टाने देश घडविण्यासाठी निर्माण केलेल्या भारतीय संविधानामध्ये अनेक नैतिक मूल्यांचा समावेश केला .संविधानात नागरिकांच्या मूलभूत हक्क व अधिकाराचा अंतर्भाव करण्यात आला. संविधानाच्या प्रास्ताविकेत समाविष्ट आहे की ,स्वातंत्र्य ,समता , बंधुता ,न्याय ,राष्ट्रीय एकता व एकात्मता ,धर्मनिरपेक्षता ,समाजवाद ,लोकशाही ,गणराज्य प्रस्थायी करायचे आहे .संविधानाचा हा निश्चय व निर्धार नागरिक कर्तव्य पार पाडल्याशिवाय पूर्णत्वास येऊ शकत नाही. अशी संविधान निर्मातांना दूरदृष्टी होती.

१९ व्या शतकाच्या मध्यार्धापासून भारतामध्ये सामाजिक, राजकीय व धार्मिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या , या चळवळी मधून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ,समाजवाद, सार्वभौमत्व,लोकशाही ,राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी मूल्य भारतीय लोकांपुढे आले त्याच मूल्यांचा भारतीय संविधान निर्माण करताना विचार केला गेलेला दिसतो. याचबरोबर ब्रिटिशांनी भारतीयांसाठी अनेक कायदे निर्माण केले होते त्या कायद्यांचा देखील भारतीय संविधान निर्मितीवर प्रभाव झालेला आहे त्या प्रभावाचा देखील या ठिकाणी शोध घेता येईल.

भारतीय संविधान निर्मितीची सुरुवात खऱ्या अर्थाने 9 डिसेंबर 1946 रोजी सुरू झाली ,परंतु त्याआधी देखील भारतीयांसाठी एक घटना असावी असा विचार पुढे आलेला

होता.भारतीय संविधान सभेच्या इतिहासावर नजर टाकली असता ,सर्वात प्रथम इ. स. १८९५ मध्ये 'स्वराज्य विधेयका 'द्वारे लोकमान्य टिळकानी संविधान निर्मितीची मागणी केली होती. यानंतर भारतीय राजकारणात महात्मा गांधी यांचा प्रवेश झाल्यानंतर संविधान निर्माण भारतीय लोकांच्या इच्छेनुसार करण्याची मागणी त्यांनी इ..स.१९२२ मध्ये केली. इ.स .१९२४ मध्ये स्वराज्य पक्षाने संविधानाविषयीचा विचार मांडला. भारतीयांनी भारतीयांसाठी संविधान निर्मितीचा पहिला प्रयत्न इ. स. १९२८ मध्ये पंडित मोतीलाल नेहरू यांनी नेहरू अहवालाच्या स्वरुपात केला.इ.स.१९३४ मध्ये सर्वात प्रथम मानवेंद्रनाथ राय यांनी संविधान सभेची संकल्पना मांडली. यानंतर काँग्रेस पक्षाने भारतीय संविधान सभेसाठी जोर धरला आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची प्रमुख मागणी म्हणून भारतीयसाठी भारतीय घटना असावी ही बाब समोर .

ऑगस्ट ऑफर 'द्वारे ब्रिटिशांनी पहिल्यांदाच भारताची घटना भारतीयांनी तयार करावी ,हे तत्वतः मान्य केले .ई.स .१९४६ मध्ये भारताची संविधान सभा 'कॅबिनेट मिशन प्लान'नुसार तयार करण्यात आली. १९४६ च्या कॅबिनेट मिशन प्लॅनच्या अंतर्गत भारतीय संविधान सभेसाठी प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या. भारतीय संविधान निर्मितीसाठी एकूण ३८९ सदस्याची एक संविधान सभा गठित करण्याचे ठरविले त्यामध्ये २९२ राज्यांची प्रतिनिधी होते ९३ हे संस्थानिकांचे प्रतिनिधी होते आणि ४ दिल्लीचे मुख्य आयुक्त प्रांत अजमेरवाड, कुर्ग आणि ब्रिटिश बलुचिस्तानचे होते .

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभा गठित करण्यात आली याच दिवशी सकाळी ११ वाजता संविधान सभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले. सच्चिदानंद सिन्हा या समितीचे हंगामी अध्यक्ष होते .पुढं ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ .राजेंद्रप्रसाद या समितीचे अध्यक्ष झाले . समितीत ३८९ सदस्य होते .फाळणीनंतर २९२ सदस्यसंख्या झाली .समितीच्या ११ बैठका झाल्या . त्या १६५ दिवस चालल्या .समितीच्या १९ उपसमित्या जलद कामकाजाच्या दृष्टीनं कार्यरत होत्या .त्यात मसुदा समिती होती .या महत्त्वाच्या समितीच्या अध्यक्षपदी डॉ .बाबासाहेब आंबेडकर होते .या मसुदा समितीच्या ४४ सभा झाल्या .१३ फेब्रुवारी १९४७ रोजी या समितीने घटनेचा मसुदा अध्यक्षांना सादर केला .पुढं हा मसुदा जनतेच्या विचारार्थ खुला ठेवण्यात आला.भारतीय जनतेनं मसुदा समितीला सात हजार ५३५ सूचना सादर केल्या. त्यातील काही सूचना रद्द ठरवून दोन हजार ४७३ सूचनांवर सविस्तरपणे चर्चा घडविण्यात आली आणि त्या रास्त सूचना स्वीकारण्यात आल्या. ही चर्चा १४४ दिवस चालली. ४ नोव्हेंबर १९४९ रोजी चर्चेची प्रक्रिया सुरू होती. घटनेचा सुधारित मसुदा तयार करून समितीनं २५ नोव्हेंबरला सादर केला. त्याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं समितीसमोर समारोपाचे भाषण झालं. संविधान निर्मितीची ही प्रक्रिया २ वर्ष ११ महिने १८ दिवसात पूर्ण झाली आणि २६ नोव्हेंबर १९४७ रोजी संविधान सभेने भारतीय संविधान पूर्णतः मंजूर करून स्वीकारले . अशारितीनं राज्यघटना

समितीची प्रक्रिया पूर्ण झाली. २६ जानेवारी १९५० रोजी तिची अंमलबजावणी करण्यात आली आणि भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात आले.

संशोधनाची आवश्यकता :

जशी व्यक्तीला मूलभूत गरज म्हणून अन्न वस्त्र निवारा याची गरज किंवा आवश्यकता असते तसेच त्यांना स्वतःचा सर्वांगीण विकास करण्यासाठी संविधानाची आवश्यकता असते.भारत संविधान निर्मितीच्या अमृत महोत्सवी वर्षांमध्ये (२०२४) आज पाऊल टाकत असताना देखील भारतीय समाजातील अनेक नागरिकांना भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास ,पार्श्वभूमी व संविधानातील तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य काय आहेत याची जाणीव नाही .आजही अनेकांना प्रश्न पडतो की संविधान सभेने निर्माण केलेले भारतीय संविधान यावर भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील राजकीय ,सामाजिक व सांस्कृतिक मूल्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणा देण्यासाठी आवश्यक आहेतकी नाही ?या प्रश्नाचा शोध घेणे गरजेचे आहे. या दृष्टीने प्रस्तुत विषयाची आवश्यकता ठरते. आणि आजच्या या तरुण पिढीला तत्कालीन परिस्थिती ची जाणीव असणे गरजेचे आहे . तत्कालीन राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक मूल्याचा भारतीय संविधान निर्मितीवर झालेला प्रभाव व्यक्तिविकासाला व राष्ट्र विकासाला खऱ्या अर्थाने फायदेशीर आहे किंवा नाही याची चिकित्सा करण्याची आवश्यकता आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

या शोध प्रबंधाच्या माध्यमातून भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकता येईल . तत्कालीन परिस्थितीचा भारतीय संविधान निर्मितीवर झालेला परिणाम व प्रभाव लक्षात येईल .भारतीय संविधान निर्मितीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने त्याचे स्मरण व जाणीव होईल .भारतीय संविधान सभेतील विविध समित्यांचे योगदान लक्षात येईल. आजच्या या तरुण पिढीला संविधान समितीने निर्माण केलेले भारतीय संविधान किती मार्गदर्शन आहे हे समजण्यास मदत होईल. याचबरोबर भारतीय संविधान निर्मितीला ऐतिहासिक पार्श्वभूमी काय आहे याची ओळख होईल .आणि या संशोधनाद्वारे भारतीय संविधान निर्मितीवर जी टीका केली जाते की काँग्रेस पक्षाने ब्रिटिश सत्ता उलथून टाकण्याचे नव्हे तर त्यांची सत्ता भारतीयांच्या हाती हस्तांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे याची कारणमीमांसा करण्यात येईल. याचबरोबर भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील राजकीय सामाजिक व सांस्कृतिक मूल्य संविधान निर्मितीच्या माध्यमातून नागरिकांना समजण्यास मदत होईल.

संशोधनाची उद्दिष्टे :

1. भारतीय संविधानाची पार्श्वभूमी ज्ञात करून घेणे.
2. संविधान निर्मितीच्या प्रक्रियेतील विविध समित्या व त्यांची योगदान अधोरेखित करणे
3. भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन राजकीय मूल्यांच्या प्रभावांचा शोध घेणे.
4. भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन सामाजिक मूल्यांचा प्रभाव जाणून घेणे.
5. भारतीय संविधान निर्मिती व तत्कालीन सांस्कृतिक मूल्यांचा प्रभाव अधोरेखित करणे.
6. भारतीय संविधानावर तत्कालीन इतर देशाच्या संविधानातील मूल्याच्या प्रभावाची चिकित्सा करणे.

संशोधनाची गृहितके :

1. भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी आजतागायत बऱ्याच भारतीय नागरिकांना ज्ञात नाही.
2. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील संघर्षातून भारतीय संविधानाची निर्मिती झाली आहे.
3. भारतीय संविधान निर्मितीत तत्कालीन राजकीय मूल्यांचा प्रभाव आहे.
4. भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन सामाजिक मूल्यांचा प्रभाव झालेला आहे.
5. भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन सांस्कृतिक मूल्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.
6. ब्रिटिश कालखंडात निर्माण झालेल्या कायद्याचा भारतीय संविधानावर प्रभाव जाणवतो.
7. तत्कालीन पाश्चात्य संविधानाचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध प्रबंधाचे संशोधन करताना सर्वप्रथम संविधान निर्मिती वरील संदर्भ ग्रंथ संकलित केले जातील व त्याचा अभ्यास केल्या जाईल. संविधान सभेच्या बैठकीतील (11 बैठका)भाषणाचा आढावा घेतला जाईल . याचबरोबर भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील राजकीय ,सामाजिक व सांस्कृतिक मूल्य यांच्यावर आधारित विविध ग्रंथाचा शोध घेऊन त्याचा अभ्यास केला जाईल.आणि ऐतिहासिक संशोधन पद्धतीने वर्णनात्मक ,विश्लेनात्मक व निवड पद्धती या पद्धतीचा आधार घेऊन संशोधन केले जाईल.

क्षेत्र व मर्यादा :

1950 नंतरच्या घटना दुरुस्त्यांचा अभ्यास यामध्ये केला जाणार नाही. केवळ घटना निर्मितीच्या तत्कालीन राजकीय सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचा यामध्ये अभ्यास केला जाईल. याचबरोबर 19 व्या शतकाच्या उत्तरर्धापासून(१८८५) ते १९४९ पर्यंत च्या कालखंडातील मूल्यांचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात केला जाईल.संशोधनामध्ये जरी पाश्चात्य देशांच्या संविधानाचा प्रभाव असला तरी हे संशोधन केवळ भारताच्या क्षेत्रापूरते मर्यादित असेल . भारतीय संविधान निर्मितीवर भारताच्या प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक अशा सामाजिक व राजकीय मूल्यांचा प्रभाव देखील आहे परंतु केवळ 1885 नंतर च्या मूल्यांच्याच राजकीय ,सामाजिक व सांस्कृतिक मूल्याचांच विचार केला जाईल.

तथ्य संकलन व तथ्य विश्लेषण :

विविध ग्रंथालयातून संबंधित संदर्भ ग्रंथ संकलित केले जातील व याचबरोबर यापूर्वी संविधान निर्मिती वर आधारित पूर्व संशोधन लेखांचा अभ्यास करून नियतकालिके वर्तमानपत्रे यामधील तसेच संविधान सभेतील बैठकांचे अहवाल भाषणे हे संकलित करून त्यांचे विश्लेषण केले जाईल. याचबरोबर संविधान निर्मितीची प्रक्रिया बाबत किंवा संबंधित माहिती असणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जातील. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सामाजिक स्वातंत्र्याचा लढा व राजकीय स्वातंत्र्याचा लढा यावर आधारित विविध संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरणांची विभागणी: :

प्रकरण : 1 प्रस्तावना , संविधान सभेची पार्श्वभूमी व निर्मिती.

प्रकरण : 2 संविधान सभेतील विविध समित्या ,त्यांचे कार्य व योगदान.

.**प्रकरण: 3** भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन राजकीय मूल्यांचा झालेला प्रभाव.

प्रकरण: 4 भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन सामाजिक मूल्यांचा झालेला प्रभाव.

प्रकरण: 5 भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन सांस्कृतिक मूल्यांचा झालेला प्रभाव.

प्रकरण : 6 भारतीय संविधान निर्मितीवर तत्कालीन पाश्चात्य संविधानाच्या

प्रभावाची चिकित्सा.

प्रकरण : 7 भारतीय संविधान निर्मितीत आलेल्या अडचणी यश व सारांश अणि निष्कर्ष.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) सुभाष कश्यप -भारतीय संविधानाचा संक्षिप्त ज्ञानकोश नवी दिल्ली, व्हिजन बुक्स 2009

2) डॉ. कुलकर्णी बी. वाय.-भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया ,एज्युकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद 2013

3) बसु डी. डी.-भारतीय संविधानाची ओळख ,नागपूर वर्धा 2001

4) डॉ. जोशी बी. आर.-इतिहास संरक्षण शास्त्र डायमंड पब्लिकेशन

5) ऑस्टिन ग्रॅनविले -भारतीय संविधान राष्ट्राचा आधार नवी दिल्ली, ओसीसी इंडिया 1999

6) पाटिल न. बी.-आपली संसद नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली, इंडिया

7) एम. लक्ष्मीकांत, -इंडियन पॉलिटी फॉर सिविल सर्विसेस एक्झामिनेशन 7 वी आवृत्ती नवी दिल्ली, टाटा मॅक्रा व्हील एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड,2024

8) डॉ. गवई सुभाष- भारतीय घटनेचा उगम आणि 1909 ,1919,1935 चा कायदा, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर

9) डॉ. राउत अनंत- भारतीयांचा पवित्र ग्रंथ :भारताचे संविधान, रचना प्रकाशन नांदेड द्‌वितीय आवृत्ती2010

10) डॉ. कांबळे राजेंद्र -भारतीय संविधान, ऋचा प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती 2016

11) सुभाष कश्यप -आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया ,दुसरी आवृत्ती 2008

12) डॉ. कसबे रावसाहेब-डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना ,सुगावा प्रकाशन पुणे तृतीय आवृत्ती 2003

13) डॉ. बकाने छाया -भारतीय राजकीय व्यवस्था, पुणे

14) धर्माधिकारी दादा-आपल्या गणराज्याची परमधाम प्रकाशन ,पवनार वर्धा 1993

15) घोडेस्वार देविदास - संविधान सभा डिबेट्स निकाय2 , राईट थिंकर्स पब्लिकेशन अँड डाक्युमेन्टेशन ,प्रा. ली. नागपूर प्रथम संस्करण 2013

16) चपळगावकर नरेंद्र - महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना, राजहंस प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 2013

17) डॉ. साबळे आर. डी.-भारतीय संविधानाचे वैचारिक अंतरंग,क्रिएटिव्ह पब्लिकेशन नांदेड ,प्रथम आवृत्ती 2016

18) डॉ. जोशी बी. आर.,प्रा. सौ. जोशी भाग्यरेखा- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटना समितीतील भाषणे भाग 1,सुगावा प्रकाशन ,पुणे द्वितीय आवृत्ती 2012

● संशोधक ●
गजानन विश्वनाथ गायकवाड
(एम. ए. सेट)

●मार्गदर्शक●
डॉ. विठ्ठलराव व्ही.घुले
प्राचार्य
राजर्षी शाहू कॉल,
परभणी